| CNR No. MHNS110007332017 | दाखल दिनांक | : | ०३/०५/२०१७ | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | ०३/०५/२०१७ | | |
| | निकाल दिनांक | : | १०/०३/२०२६ | | |
| | कालावधी | : | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०८ | १० | ०७ |
| | **निशाणी क्र.२८** | | | | |

**<u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, निफाड यांचे न्यायालयात</u>**

( *पिठासीन अधिकारी एस.पी.देशपांडे* )

**<u>नि. फौ. खटला क्र. १०४/२०१७</u>**

(सायखेडा पोलीस ठाणे गु.र.क्र.१६/२०१७)

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | ... | **महाराष्ट्र सरकार**<br>तर्फे पोलीस ठाणे अंमलदार<br>सायखेडा पोलीस ठाणे, ता. निफाड, जि. नाशिक |
| **फिर्यादीतर्फे अभियोक्ता** | ... | **श्रीमती आर. बी. जाधव** |
| | | **<u>विरुध्द</u>** |
| **<u>आरोपी</u>** ... | | **देविदास उर्फ जिवा उत्तम संगमनेरे,**<br>वय : ३२ वर्षे,<br>राहणार : खेरवाडी, ता. निफाड, जि. नाशिक. |
| **आरोपींतर्फे विधिज्ञ** | ... | **श्रीमती ए. एम. शेख** |

**(फौजदारी आदेशीका प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(II) अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | १९.०२.२०१७ |
| गुन्हयाचे प्रथम खबरीचा दिनांक | : | ०३.०३.२०१७ |
| आरोपपत्र पाठविल्याचा दिनांक | : | ०३.०५.२०१७ |
| आरोपींवर आरोप ठेवल्याचा दिनांक | : | २३.१२.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | ०७.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | : | १०.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १०.०३.२०२६ |
| शिक्षा असल्यास, शिक्षा ठोठावल्याचा दिल्याचा दिनांक | : | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जमिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | निर्दोष किंवा दोषी? | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | देविदास उर्फ जिवा उत्तम संगमनेरे | ०३.०३.२०१७ | १७.०३.२०१७ | भा.दं.वि. ३५४, ३५४(ब), ३२४,५०४,५०६ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## न्या य नि र्ण य

**( घोषणा दिनांक १० मार्च, २०२६ )**

**०१.** आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम भा.दं.वि. ३५४,३ ५४(ब), ३२४, ५०४, ५०६ प्रमाणे खटल्यास सामोरे जात आहे.

**अभियोग पक्षाच्या प्रस्तुत खटल्याची पार्श्वभूमी थोडक्यात खालीलप्रमाणे**

**०२.** पिडीता ही खेरवाडी शिवार, पिंप्री रोड, ता. निफाड, जि. नाशिक येथील रहिवासी असुन ती शेती काम करते. (यापुढे फिर्यादीची ओळख गुप्त ठेवण्याकरीता तिला 'पिडीता' म्हणुन संबोधण्यात येईल) घटनेच्या दिवशी म्हणजे दिनांक १९.०२.२०१७ रोजी दुपारी ०१:३० वाजता पिडीता तिच्या राहत्या घरून त्यांच्या खेरवाडी शिवारातील तळयाचे मळयातील शेतात जात असतांना पिंप्री रोडवर चुलत दीर म्हणजेच आरोपी जीवा उत्तम संगमनेरे हा त्याचे लाल रंगाची पॅशन मोटर सायकलवर रोडवर आला व तिला म्हणाला की, मला तुमच्या मळयातील द्राक्ष बाग पाहायचा आहे. तुम्ही शेतात चालले काय असे विचारले. म्हणून तिने त्यास सांगितले की, मी शेतात चालले आहे, तुमचे मोटर सायकलवर बसणार नाही, असे सांगितले. त्याने जास्त बळजबरी केल्याने ती त्याचे मोटर सायकलवर बसली. त्याने तिला त्यांचे तळयाच्या मळयातील शेतात सोडले. तिने शेतातील विहीरीमध्ये माशांना पोळयांचे तुकडे करून टाकले व द्राक्ष बागेच्या पश्चिम बाजु कडील गल्ली मध्ये गेली. तेव्हा आरोपी हा तिच्या पाठीमागे आला व त्याने तिचा हात धरला व तिला म्हणाला की, मला किस घेवू दे. असे म्हणून तिच्याशी अंगलट करू लागला तेव्हा तिने त्याचा हात झटकून हातातील खुरपे

त्याचे अंगावर उगारले. त्यानंतर तो थोडा मागे झाला. तो तिला म्हणाला की, तु आता आज दिवस असल्याने वाचली, तुला रात्री झोपेतून उचलून नेईल व माझी इच्छा पुर्ण करील, तु कोणाला काही सांगितले तर तुला मारून टाकील असा दम दिला व तो त्याचे मोटर सायकलवर बसुन निघून गेला. तिने भितीपोटी तिचा नवरा व सासु—सास—यांना त्या दिवशी काही एक सांगितले नाही. तीन ते चार दिवसांनी तिने झालेला प्रकार पती गोरखनाथ व सासु सास—यांना सांगितला. त्यानंतर तिला पती गोरखनाथ यांनी तिच्या आई वडीलांकडे दिक्षी येथे पोहचवून दिले.

**०३.** त्यानंतर दि.०२.०३.२०१७ रोजी रात्री ०८:०० वाजता तिला तिचा भाउ सतिश हरीभाउ चौधरी, मंगेश हरीभाउ चौधरी असे खेरवाडी येथे तिच्या घरी घेवून आले व भावांनी आरोपीस बोलावून घेतले. त्यांनी त्यास विचारले की, तु आमचे बहीणीचा हात का धरला होता व तिस मोटर सायकलवर का बसवून नेले होते असे विचारले असता, त्याने पिडीता व तिच्या भावांना व पती गोरखनाथ अशांना शिवीगाळ केली व हातात कु—हाड घेवून मारण्यासाठी धावून आला. त्यावेळी तिची सासु बेबीबाई संगमनेरे ही सोडविण्यासाठी आली असता तिचे डावे हाताच्या पंजावर कु—हाड लागल्याने तिला दुखापत झाली. त्यानंतर आरोपी हा तुमच्याकडे बघतो, तुम्हाला घरातुन काढून मारील असा दम देत पळून गेला. त्यानंतर ती व पती गोरखनाथ, भाउ सतिश चौधरी, मंगेश चौधरी व दीर माधव संगमनेरे, आई मिराबाई चौधरी असे सायखेडा पोलीस स्टेशनला आले व आरोपीविरूध्द फिर्याद दाखल केली.

**०४.** मूळ फिर्यादीच्या फिर्यादवरुन आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानचे कलम ३५४, ३५४(ब), ३२४, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा क्रमांक १६/२०१७ नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार, ब.नं.५९ श्री. एन. एम. खोडे यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला. घटनास्थळावरून एक लोखंडी कु—हाड जप्त केली. साक्षीदाराचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. आरोपींना अटक केली, साक्षीदारांचे त्यांच्या सांगितल्याप्रमाणे जबाब नोंदविले व तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०५.** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरूध्द निशाणी क्रमांक ११ प्रमाणे भारतीय दंड संहिताचे कलम ३५४, ३५४(ब), ३२४, ५०४, ५०६ प्रमाणे दोषारोप निश्चित केले. सदरचे दोषारोप आरोपींना त्याचे मातृभाषेत वाचून व समजावून सांगण्यात आले. आरोपींनी गुन्हा नाकबूल करुन संपरिक्षेच्या समोर जाण्याची तयारी दर्शविली.

**०६.** प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना फिर्यादी व आरोपी यांनी संयुक्त पुरसीस निशाणी क्रमांक १९ अभिलेखावर दाखल करुन सदर प्रकरणात त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर आपसांत तडजोड झाली असून फिर्यादी व साक्षीदारांना आता सदर प्रकरण आरोपींविरुध्द पुढे चालवावयाचे नसल्याचे कळविले.

**०७.** अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी वकील व आरोपीतर्फे त्यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभियोगपक्षाची हकीकत व प्रस्तुत प्रकरणात सादर केलेल्या सर्व साक्षीपुराव्यांचे अवलोकन करता माझे निष्कर्षाकरीता उपस्थित झालेले मुद्दे कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.नं | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, आरोपीने दिनांक १९.०२.२०१७ रोजी दुपारी ०१.३० वाजेच्या सुमारास पिंप्री रोड, ता. निफाड, जि. नाशिक येथे पिडीतेचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिचा हात धरून तिच्यावर फौजदारीपात्र बलप्रयोग केला व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ३५४ अन्वये गुन्हा केला ? | **नाही** |
| ०२. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने पिडीतेकडून लैंगिक अनुकूलतेची मागणी केली व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ३५४(ब) अन्वये गुन्हा केला ? | **नाही** |
| ०३. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त तारीख, वेळ व ठिकाणी येथे आरोपीने फिर्यादीच्या डोक्यास कु—हाडीच्या दांडयाने व आरोपीने कु—हाडीने | **नाही** |

| | | |
|---|---|---|
| | साक्षीदार यांच्या हाताच्या पंज्यावर मारून इच्छापुर्वक दुखापत पोहोचविली व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ३२४ अन्वये गुन्हा केला ? | |
| ०४. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त तारीख, वेळ व ठिकाणी अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी व साक्षीदार यांना अपमानित केले व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ५०४ अन्वये गुन्हा केला? | **नाही** |
| ०५. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने पिडीता व साक्षीदारास जिवे मारण्याची धमकी देवुन फौजदारी पात्र दमदाटी केली व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ५०६ अन्वये गुन्हा केला? | **नाही** |
| ०६. | आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली.** |

**: कारणमिमांसा :**

**०८.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द दोषारोप शाबीत करण्यासाठी साक्षीदार क्रमांक ०१ पिडीता हिची साक्ष निशाणी क्रमांक २२ अन्वये नोंदवली. फिर्याद निशाणी क्रमांक पी—१/पीडब्ल्यु—१ वर आहे. साक्षीदार क्र.२ बिबाबाई रघुनाथ संगमनेरे यांची साक्ष निशाणी क्रमांक २३ अन्वये नोंदविली. सदर प्रकरणात सहाय्यक सरकारी वकील यांनी पुरसिस निशाणी क्रमांक २७ देवुन त्यांना आणखी पुरावे द्यावयाचे नसल्याचे कळविले. अभियोगपक्षाच्या साक्षीदाराच्या साक्षीत आरोपीविरुध्द कसलाही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आला नसल्यामुळे आरोपीचे बयाण कलम ३५१ भारतीय नागरीक सुरक्षा संहिता अन्वये नोंदविण्यात आले नाही. आरोपीने त्याच्या बचावाच्या समर्थनार्थ कोणताही मौखिक किंवा कागदोपत्री

पुरावा सादर केला नाही. मी दोन्ही पक्षांतर्फे युक्तीवाद ऐकून घेतला आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ०१ ते ०५ करीता</u> :**

**०९.** साक्षीदार क्रमांक ०१ पिडीता हिने तिच्या साक्षेत कथन केले की, घटना कुठे, किती वाजता व काय घडली हे तिला माहित नाही. तिने आरोपीविरूध्द सायखेडा पोलीस स्टेशन येथे सदरची तक्रार दाखल केली. पिडीताने फिर्यादवरील तिची सही ओळखली. परंतु त्यामधील मजकुराबाबत पूर्णत: अनभिज्ञता दर्शविली. म्हणून फिर्यादला फिर्यादीच्या सहीच्या हद्दीपर्यंत निशाणी क्रमांक पी—१/पीडब्ल्यु—१ देण्यात आली. पिडीता ही फिर्यादप्रमाणे साक्ष देत नसल्याच्या कारणावरुन सरकारी वकीलांनी तिला उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी घेवून तिची कसून उलटतपासणी घेतली. परंतु पुढे देखील तिने फिर्यादीतील संपुर्ण मजकूर स्पष्टपणे नाकारला आहे. ती कथन करते की, तिच्यावर चांदोरी येथील सरकारी दवाखान्यात उपचार करण्यात आले होते.

**१०.** याउलट, उलटतपासात ती मान्य करते की, आरोपी व आमच्यात समझोता झालेला आहे. आरोपी व त्यांच्यात किरकोळ वाद झाला होता व त्यामुळे गैरसमजुतीतून तिने आरोपींविरोधात फिर्याद दाखल केली होती. पिडीतेस शेतात काम करीत असतांना दुखापत झाली होती व त्यामुळे तिच्यावर चांदोरी येथील सरकारी दवाखान्यात उपचार करण्यात आले होते. तिची आरोपींविरोधात काहीही तक्रार राहिलेली नसल्याचे ती मान्य करते. अशाप्रकारे अभियोग पक्षाच्या या महत्त्वाच्या साक्षीदाराच्या साक्षेत आरोपीविरुध्द कसलाही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब, सदर पिडीतेची साक्ष ही अभियोग पक्षाला प्रस्तुतचा गुन्हा शाबीत करण्यासाठी काहीही उपयोगी ठरत नाही.

**११.** साक्षीदार क्रमांक ०२ बिबाबाई रघुनाथ संगमनेरे हिने तिच्या साक्षेत कथन केले की, हे त्याला आठवत नाही की, घटना कुठे, किती वाजता व काय घ ाडली, पोलीसांनी त्याचा जबाब नोंदविला होता किंवा कसे. साक्षीदार ही तिच्या जबाबाप्रमाणे साक्ष देत नसल्याच्या कारणावरुन सरकारी वकीलांनी तिला उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी घेवून तिची कसून उलटतपासणी घेतली.

परंतु पुढे देखील तिने तिच्या जबाबातील संपुर्ण मजकूर स्पष्टपणे नाकारला आहे. ती कथन करते की, तिच्यावर व तिच्या सुनेवर चांदोरी येथील सरकारी दवाखान्यात उपचार करण्यात आले होते.

**१२.** याउलट, तिने तिच्या उलटतपासात कबुल केले आहे की, त्यांच्यात व आरोपीमध्ये समझोता झालेला आहे. तिला झालेली दुखापत ही ती स्वत:हून शेतात काम करीत असतांना झाली होती व त्यामुळे तिच्यावर चांदोरी येथील सरकारी दवाखान्यात उपचार करण्यात आले होते. अशाप्रकारे अभियोग पक्षाच्या या महत्त्वाच्या साक्षीदाराच्या साक्षेत आरोपीविरुध्द कसलाही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब, सदर साक्षीदाराची साक्ष ही अभियोग पक्षाला प्रस्तुतचा गुन्हा शाबीत करण्यासाठी काहीही उपयोगी ठरत नाही.

**१३.** अभियोग पक्षाचे महत्त्वाचे साक्षीदार म्हणजे साक्षीदार क्रमांक ०१ पिडीता व साक्षीदार क्र.२ बिबाबाई रघुनाथ संगमनेरे यांनी त्यांच्या साक्षीत घटनेबाबत पूर्णत: अनभिज्ञता दर्शविली. त्यामुळे त्यांच्या साक्षीत आरोपीविरुध्द कसलाही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आलेला नाही. वर नमुद केल्याप्रमाणे पिडीता व साक्षीदाराची आरोपीसोबत न्यायालयाबाहेर आपसांत तडजोड झाल्याचे दिसून येते. कदाचित त्यामुळे त्यांना आरोपीविरुध्द साक्ष देण्यात काही स्वारस्य राहिले नसावे. परंतु, कारण काही असले तरी सदर साक्षीदारांच्या साक्षीत आरोपीविरुध्द कसलाही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच अभियोग पक्षाच्या एकही साक्षीदाराच्या साक्षेत आरोपीविरुध्द कसलाही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब, वरील सर्व बाबींचा साकल्याने विचार केला असता मी या निष्कर्षावर येऊन पोहोचलो आहे की, अभियोग पक्ष आरोपीविरुध्द कसलाही गुन्हा संशयापलीकडे शाबीत करण्यास अपयशी ठरले आहे. म्हणून मी मुद्दा क्रमांक ०१ ते ०५ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ०६ करीता :</u>**

**१४.** मुद्दा क्रमांक ०१ ते ०५ चे निष्कर्ष मी नकारार्थी नोंदविले आहे. म्हणून मुद्दा क्रमांक ०६ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

**०१.** आरोपी **देविदास उर्फ जिवा उत्तम संगमनेरे** या खटल्यातून भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७१(१) अन्वये, भारतीय दंड विधानचे कलम ३५४, ३५४(ब), ३२४, ५०४, ५०६ या गुन्ह्यांतून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**०२.** आरोपीचे जामीन कद्बे रद्द करण्यात येत आहेत.

**०३.** जप्त मुदद्देमाल एक कु—हाड ही मुल्यहीन व निरउपयोगी असल्यामुळे अपिल कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावी.

**०४.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७—अ अन्वये प्रत्येकी रु.१५,०००/— (रुपये पंधरा हजार फक्त) ची जामीन द्यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

SNEHA PRADEEP DESHPANDE
Digitally signed by SNEHA PRADEEP DESHPANDE
Date: 2026.03.12 15:07:09 +0530

**( एस. पी. देशपांडे )**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**निफाड.**

**दिनांक : १०.०३.२०२६.**
**स्थळ : निफाड**

**(फौजदारी आदेशीका प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(III) अन्वये)**

**अभियोजन पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदारांची यादी**

**अ.अभियोग पक्ष**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१<br>नि.क्र.१८ | पिडीता | फिर्यादी |
| अ.सा.क्र.२<br>नि.क्र.१९ | बिबाबाई रघुनाथ संगमनेरे | साक्षीदार |

**ब. बचावपक्ष.**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.क्र. | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार.**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.क्र. | निरंक | निरंक |

**पुराव्यादरम्यान दिलेल्या निशाण्या व वस्तुंचे क्रमांकाची यादी**

**अ.अभियोग पक्ष**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | अ.सा.क्र.१<br>नि.क्र.पी-१/पीडब्ल्यु-१ | फिर्यादीवरील स्वाक्षरी |

**ब. बचावपक्ष.**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशाणी.**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | २४ | घटनास्थळ पंचनामा |

| | | |
|---|---|---|
| ०२. | २५ | बेबीबाई संगमनेरे यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ०३. | २६ | पिडीतेचे वैद्यकीय प्रमाणपत्र |

## ड. महत्वाच्या वस्तु : (Material Objects)

| **क्रमांक** | **महत्वाच्या वस्तुंचे क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

SNEHA PRADEEP DESHPANDE　Digitally signed by SNEHA PRADEEP DESHPANDE Date: 2026.03.12 15:06:57 +0530

**( एस. पी. देशपांडे )**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**निफाड.**

**दिनांक : १०.०३.२०२६.**
**स्थळ : निफाड**